ePaper

# सत्तासंघर्षात भाजपची उडी; बहुमत सिद्ध करण्याचे आदेश देण्याची राज्यपालांकडे मागणी




| वर्ष - 6 | अंक - 84 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 29 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- संत तुकाराम महाराज पालखीचे; बारामती शहरात उत्साहात स्वागत
- अग्निपथ योजनेमुळे युवकांचे भवितव्य धोक्यात !
- संजय राठोड यांचा हिशेब चुकता करणार




"महाविकास आघाडी सत्तेतून पायउतार होईल अशी भावना सामान्य जनता तसेच भाजपा कार्यकर्त्यांच्या मनात आहे. त्यामुळे येणाऱ्या आषाढीला देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री असतील आणि तेच आषाढीची पूजा करतील. देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र याशिवाय आता पर्याय नाही. कायदेशीर बाबींवर विचार झाला आहे. हा दोन गटांतील वाद आहे. सर्वोच्च न्यायालयाने यामध्ये लक्ष घातलं आहे. लवकरच हा विषय मार्गी लागेल.

- **राधाकृष्ण विखे पाटील,** भाजप नेते

सबको समजा... आपको समजा क्या? पुन्हा एकदा महाभकास आघाडीचे गणित चुकले आणि पुन्हा एकदा मुख्यमंत्री तोंडावर आपटले. आता कोण एकटे पडले हे समजले असेलच. तुमच्यात एकजूट किती आहे, हे सगळ्यांना समजले. पण तुम्हाला कधी समजणार?, असा सवाल शालिनी ठाकरे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना केला आहे. एकनाथ महाराज की जय !! मला सर्वसामान्य शिवसैनिक मुख्यमंत्री झालेला पाहायचा आहे. स्वतःच्या वाक्याचा विसर पडलेला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आज एकनाथ महाराज नक्कीच आठवले असतील. दीपाली ताई आपण आता स्वतःच्या पक्षाच्या तब्येतीची काळजी घ्या.

-**शालिनी ठाकरे,** मनसे



## देशाच्या न्यायव्यवस्थेवर भाजपचा पूर्ण विश्वास – आ. महेश लांडगे

# मोदी यांच्या निष्कलंक नेतृत्वावर न्यायालयापाठोपाठ जनतेचेही शिक्कामोर्तब!

## भाजपा शहराध्यक्ष आमदार महेश लांडगे यांच्याकडून पंतप्रधानांचे अभिनंदन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।

तब्बल २० वर्षांच्या न्यायालयीन संघर्षास संयमीपणे साजरे जाणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधातील काँग्रेसच्या जकिया जाफरी यांची याचिका निकाली काढून सर्वोच्च न्यायालयाने पंतप्रधान मोदी यांच्या निर्दोषत्वावर शिक्कामोर्तब केल्याने भारतीय जनता पार्टीची मान अभिमानाने उंचावली आहे. ही मोदी यांच्यासाठी आणि भाजपासाठी सर्वोच्च समाधानाची बाब असून, ताज्या पोटनिवडणूक निकालाने देशातील सर्वसामान्य जनतादेखील



मोदी आणि भाजपसोबत असल्याचे सिद्ध झाले आहे, असे मत भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केले आहे. आमदार लांडगे म्हणाले की, देशाच्या न्यायव्यवस्थेवर भाजपचा पूर्ण विश्वास असल्यामुळेच वीस वर्षे चाललेल्या या न्यायालयीन लढाईत भाजपने कोठेही शक्तिप्रदर्शन, आंदोलन किंवा टीकाटिप्पणी करून न्यायप्रक्रियेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला नाही, असा टोला त्यांनी विरोधी पक्षांना मारला. याउलट, या प्रक्रियेस संयमाने सामोरे जाऊन पंतप्रधान मोदी यांनी न्यायव्यवस्थेच्या सार्वभौमत्वाविषयीचा आदर देशाच्या जनतेमध्ये रुजविला. पंतप्रधानांच्या या संयमी स्वभाव वैशिष्ट्यामुळेच आज संपूर्ण देश त्यांच्या पाठीशी उभा असल्याचे चित्र असून लोकसभेच्या तीन व विधानसभेच्या सात जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपने प्रस्थापित पक्षांचे बुरुज उद्ध्वस्त करून पक्षाचा झेंडा रोवला आहे.

### पंतप्रधानांविरोधातील राजकीय कारस्थानास चपराक

पोटनिवडणुकांतील या विजयाआधी पंतप्रधान मोदी यांच्या विरोधातील फेरविचार याचिका सर्वोच्च न्यायालयानेच निकाली काढल्यामुळे भाजपचा विजय अधिक तेजस्वी झाला आहे. सन २००२ मधील गुजरात दंगलप्रकरणी नरेंद्र मोदी यांच्यासह ६४ जणांना निर्दोष ठरविण्याच्या विशेष चौकशी पथकाच्या निर्णयास काँग्रेसच्या जकिया जाफरी यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. गुजरात उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तेथेही विशेष चौकशी पथकाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याने पंतप्रधानांविरोधातील राजकीय कारस्थानास चपराक बसली आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

जनता मोदी यांच्यासोबत असून 'सबका साथ सबका विकास' या पंतप्रधानांच्या ध्येयाच्या वाटचालीत जनतेने उत्स्फूर्त सहभाग घेतल्याचे सिद्ध झाले आहे.

# प्रारूप मतदार यादीवर हरकत घेण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ द्या

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी



। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।

आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रभागानुसार फोडण्यात आलेल्या मतदार याद्यांची विभागणी प्रभाग रचनेला अनुसरून झालेली नाही. नावे दुसऱ्या प्रभागांमध्ये चुकीच्या पद्धतीने जोडली आहेत. मतदार यादीतील मतदारांची नावे शोधण्यासाठी दिलेला अवधी खूपच कमी पडत आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाला विनंती करून हरकती नोंदविण्यासाठी आणखी 15 दिवसांची मुदतवाढ मिळवून घ्यावी अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त राजेश पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, महापालिका निवडणूक शाखेने पिंपरी-चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2022 साठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या 23 जून 2022 रोजी प्रसिद्ध केल्या. त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी 1 जुलै 2022 पर्यंत मुदत दिली आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या 9 जुलै रोजी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यामुळे प्रारुप मतदार याद्यावर हरकती आणि सूचना दाखल करण्यासाठी केवळ 8 दिवसांचा वेळ मिळाला आहे. हा कालावधी खूप कमी आहे. प्रभागानुसार फोडण्यात आलेल्या मतदार याद्या परिपूर्ण प्रभाग रचनेला अनुसरून विभागणी केलेली नाही असे निदर्शनास येत आहे. सर्व प्रभागांमधील दीड ते अडीच हजार नावे मूळ प्रभागांमध्ये न राहता दुसऱ्या प्रभागांमध्ये चुकीच्या पद्धतीने जोडली आहेत. त्यामुळे प्रारूप मतदार यादीतील मतदारांची नावे शोधण्यासाठी संभाव्य उमेदवारांना व मतदारांना हरकतीसाठीचा अवधी खूपच कमी पडत आहे.

हरकती नोंदवण्यासाठी केवळ 8 दिवसांची म्हणजेच 1 जुलै 2022 पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ही मुदत कमी आहे. त्यामुळे हरकती घेण्यासाठी अजून पंधरा दिवसांची मुदतवाढ मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे महापालिका सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी प्रारूप मतदार यादीवर हरकत घेण्यासाठी 15 दिवसांची मुदतवाढ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रारूप यादीवर हरकत घेण्यासाठी मुदतवाढ मिळावी. त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाशी पत्रव्यवहार करावा आणि हरकतीसाठी मुदत वाढवून घ्यावी अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे.

## शॉर्ट न्यूज »

### मुंबई-पुणे महामार्गावर ट्रकची दुचाकीला धडक




**। लोणावळा । महाईन्यूज ।**

मुंबई- पुणे राष्ट्रीय महामार्गावर शिलाटणे गावाजळ भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने सहप्रवासी महिला आणि तीन वर्षांच्या बालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुष्पा पवन शर्मा आणि त्यांचा तीन वर्षांचा मुलगा युवराज अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. अपघातात दुचाकीस्वार पवन गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शिलाटणे फाटा परिसरातून दुचाकीस्वार पवन, त्यांची पत्नी पुष्पा आणि मुलगा युवराज जात होते. त्या वेळी अवजड ट्रकने (ट्रेलर) दुचाकीला धडक दिली. अपघातात पुष्पा आणि त्यांचा मुलगा युवराज यांचा मृत्यू झाला.

# संत तुकाराम महाराज पालखीचे; बारामती शहरात उत्साहात स्वागत

**बारामती । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे कवी मोरोपंत आणि श्री शिवलीलामृतकार श्रीधर स्वामी यांची कर्मभूमी असलेल्या बारामती शहरात आगमन झाले. 'ज्ञानोबा माऊली तुकाराम'च्या गजरात पालखीच्या आगमनाने शहरातील वातावरण भक्तीमय झाले. पाटस रोडवरील देशमुख चौकात प्रांताधिकारी दादासाहेब कांबळे यांनी पालखी रथ आणि दिंड्यांचे स्वागत केले. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, विभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे, पोलीस निरीक्षक महेश ढवाण, एन्व्हायर्नमेंटल फोरमच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, बारामती सहकारी बँकेचे अध्यक्ष सचिन सातव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शहरातील चौकाचौकात विविध संस्था आणि संघटनांकडून पालखी आणि दिंड्यांच्या स्वागतासाठी मंडप उभारण्यात आले. तसेच सेवाभावी संस्थांकडून वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य सेवा, अल्पोपहार, फळे, पाणी पुरवठा व इतर सेवा पुरवण्यात आली. दोन वर्षांच्या खंडानंतर पालखीचे दर्शन घेण्याची संधी मिळाल्याने बारामतीकरांनी गर्दी केली.

पालखी मार्गावरील सर्व रस्त्यांची स्वच्छता करून निर्मल वारीअंतर्गत शहरात विविध ठिकाणी आठशे सीट फिरते शौचालयाची सोय करण्यात आली.

बारामती नगर परिषदेकडून शारदा प्रांगण आणि नगरपरिषद परिसरात वारकऱ्यांसाठी वैद्यकीय सुविधा, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण,स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा ३.० अंतर्गत शहरात प्लास्टिक मुक्त बारामती, प्रदूषण मुक्त वारी आणि पर्यावरण हरित संतुलनासाठी उपक्रम राबवण्यात आला.

पालखी मार्गावर बारामती बँकेच्या कर्मचारी संघ, बुलढाणा अर्बन सोसायटी, प्रगती कलेक्शन यांच्यातर्फे वारकऱ्यांना खाद्यपदार्थ आणि वस्तूंचे वाटप करण्यात आले. या पालखी सोहळ्यात महाराष्ट्र शासनाचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान, सांस्कृतिक कार्य संचालनालय, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण, बारामती नगर परिषद आदी विभागांच्या चित्ररथातून शासन योजनांची माहिती देण्यात येत आहे.

# 'काय झाडी... काय डोंगार... काय हाटील...'ने सोडवली पुणेकरांची मोठी समस्या

## सांगोल्यातील शिवसेनेच्या बंडखोर आमदारांमुळे व्हायरल झालेल्या शब्दांच्या ट्रेण्डची मदत घेत सोडवली समस्या

**पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**




"काय झाडी... काय डोंगार... काय हाटील... एकदम ओके" हे शब्द मागील काही दिवसांपासून अनेकदा तुमच्या कानावर पडले असली किंवा वाचनात आले असते. एकीकडे राज्यामध्ये शिवसेना आमदारांनी बंड पुकारल्यापासून राजकीय आरोप-प्रत्यारोप होत असताना सोलापूर जिल्ह्यातील सांगोल्याचे शिवसेनेचे बंडखोर आमदार शहाजीबापू राजाराम भोसले-पाटील याच शब्दांमध्ये चर्चेत आले आहेत. शहाजीबापू पाटील यांनी कार्यकर्त्यासोबत संवाद साधताना म्हटलेले हे शब्द सध्या तुफान व्हायरल होत आहेत. शहाजीबापू पाटील यांच्या "काय झाडी, काय डोंगार, काय हाटेल" वाक्याची सध्या इतकी चर्चा आहे की यावरुन चक्क गाणीही तयार करण्यात आली आहेत. पण या 'झाडी, डोंगार, हाटील' ट्रेण्डचा वापर करुन पुणेकरांनी निकृष्ट रस्त्यांसंदर्भातील एक समस्या सोडवून दाखवल्याचं सांगितलं तर तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटेल ना? पण हे खरं आहे. सध्या याचीच चर्चा सोशल मीडियावर दिसून येतेय.

झालं असं की, पुण्यातील लक्ष्मी रस्त्यावर मधोमध असलेल्या गटाराच्या झाकणांच्या निकृष्ट कामाबद्दल स्थानिकांनी अनेकदा तक्रार केली होती. या तक्रार करणाऱ्यांमध्ये रमणबाग प्रशाला आणि लक्ष्मी रस्ता परिसरात नागरिकांचा प्रामुख्याने समावेश होता. रस्त्याच्या मधोमध असणारं हे गटाराचं झाकणं तुटून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाल्याने नागरिक याचा पाठपुरवठा करत होते. मात्र त्यांना प्रतिसाद दिला जात नव्हता आणि कामही होत नव्हतं.

अखेर पुणेकरांनी त्यांच्या स्टाइलने या प्रश्नावर तोडगा काढण्याचं ठरवलं आणि त्यासाठी त्यांनी सध्या राजकीय संघर्षामुळे आणि गुवाहाटीमधील निर्सगामुळे चर्चेत असणाऱ्या 'झाडी, डोंगार, हाटील' ट्रेण्डची मदत घेण्याचं ठरवलं. या गटाराच्या झाकणावर रस्त्याच्या संबंधित ठेकेदाराविरोधात सोमवारी फलक लावण्यात आले. या फलकावर ठेकेदाराचा क्रमांक आणि 'झाडी, डोंगार, हाटील' ट्रेण्ड स्टाइलमध्ये काही वाक्य लिहिण्यात आली होती.

पुणे शहराचे खड्डयांचे कॉन्ट्रॅक्टर... या मथळ्याखाली एक प्रिंट काढून त्याखाली कंत्राटदार कंपनीचं नावं. त्या खालोखाल पुणे महानगरपालिकेतील संबंधित विभागामधील दोन अधिकाऱ्यांचीं नावं आणि मोबाइल क्रमांक लिहिण्यात आलेले. तसेच अगदी पुणेरी टोमणे स्टाइल, "सांगून, अर्ज देऊन, भेटून यांना कळत नाही ही शोकांतिका" असा टोला लगावण्यात आलेला. फलकावर शेवटी अगदी बोल्ड फॉण्टमध्ये 'काय ते शहर, काय ते खड्डे, काय त्या रोडची अवस्था... समदं व्यवस्थित,' असा मजकूर लिहिण्यात आलेला. गटाराच्या झाकणांवरच हे प्रिंट काढून लॅमिनेट केलेले आणि एका लाकडाच्या पट्टीला जोडलेले फलक ठेवण्यात आलेले. या फलकांचे फोटो व्हायरल झाले आणि बघता बघता मेसेज जिथं पोहचणं आवश्यक होता तिथपर्यंत पोहोचला आणि चक्र फिरली.

### नागरिकांची ही भन्नाट कल्पना

नागरिकांची ही भन्नाट कल्पना कामी आली आणि त्याचा परिणाम होऊन मंगळवारी या झाकणाच्या दुरुस्तीचे कामही हाती घेण्यात आले. अवघ्या काही तासांमध्ये हे काम पूर्ण करण्यात आलं. हे काम केले जात असल्याचे फोटोही सोशल मीडियावर चर्चेत आहेत.

सांगायचा मुद्दा काय तर एकाकिडे सारेच लोक केवळ या 'झाडी, डोंगार, हाटील' ट्रेण्डचा मनोरंजन म्हणून वापर करत असतानाच दुसरीकडे स्मार्ट पुणेकरांनी याच ट्रेण्डच्या मदतीने आपल्या दैनंदिन जीवनातील एक प्रश्न मार्गी लावलाय. या प्रकरणावरुन सोशल मीडियावर अनेकजण या कल्पकतेला दाद देताना दिसत आहेत. तर बऱ्याच जणांना पुणेकरांबद्दलचं ट्रेण्डमार्क वाक्य या प्रकरणाचा निमित्ताने पुन्हा आठवलंय ते म्हणजे, "पुणे तिथे काय उणे"!

### जो पर्यंत सरकार "अग्निपथ" योजना मागे घेत नाही तो पर्यंत काँग्रेसचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करतील

# अग्निपथ योजनेमुळे युवकांचे भवितव्य धोक्यात !

## काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांचे प्रतिपादन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

केंद्र सरकारने सुरू केलेली "अग्निपथ" योजना युवकांना बेरोजगारीच्या खाईत लोटणारी आहे. संरक्षण खात्याचे हे खाजगीकरण सुरू करण्याची सरकारची सुरुवात आहे. ही योजना जो पर्यंत सरकार मागे घेत नाही तो पर्यंत काँग्रेसचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करतील असे प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी केले.

अग्निपथ ही योजना फसवी आहे हे नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसच्यावतीने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात सोमवारी (दि.२७ जून २०२२) अनुक्रमे काळेवाडी एम. एम. हायस्कूल चौक, पुणे मुंबई महामार्ग चिंचवड स्टेशन येथे आणि साने चौक येथे आंदोलन करून नागरिकांचे प्रबोधन करण्यात आले. यावेळी केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देऊन केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला.



यावेळी पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे तसेच महिला काँग्रेसचे शहर अध्यक्ष सायली नढे, माजी महापौर कवीचंद भाट तसेच अभिमन्यू दहीतुले, नरेंद्र बनसोडे, वीरेंद्र गायकवाड, उमेश खंदारे, नंदाताई तुळसे, प्रियंका कदम (मलशेट्टी,) चंद्रकांत उमरगीकर, संदीप शिंदे, आबा खराडे, हिराचंद जाधव, नितीन खाजेकर, अबूबकर लांडगे, विपुल मलशेट्टी, सुधाकर कुंभार, अण्णा कसबे, बाबा बनसोडे, गौतम ओव्हाळ, विजय ओव्हाळ, दीपक भंडारी, सतीश भोसले, बाबा वाघमारे, महानंदा कसबे, सचिन पवार, चिदानंद जमादार, मिलिंद बनसोडे, उमेश बनसोडे निवृत्ती भोसले, तात्या कांबळे, मनोज खवळे, समाधान दगडे, भारती चांदणे, अंबादास शिंदे, रमेश काकडे, आकाश शिंदे, नरेंद्र अहिरे, वैशाली शिंदे, राजू वायसे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी डॉ. कैलास कदम म्हणाले की, अग्निपथ या योजनेखाली केंद्र सरकार दरवर्षी ४६ हजार युवा सैनिकांची ४८ महिन्यांसाठी भरती करणार आहे. यापैकी ६ महिने प्रशिक्षणात जाणार आहेत. एकूण ४८ महिन्यानंतर या युवकांना ११ लाख ६७ हजार रुपये देऊन घरी पाठवले जाईल. यानंतर या युवकांना भविष्यात कोणत्याही नोकरीची हमी नाही. त्यांना निवृत्तिवेतन मिळणार नाही. ग्रॅच्युईटी, वैद्यकीय भत्ते असे कोणते फायदे मिळणार नाहीत. एरवी सैनिक भरती मध्ये पाच ते सहा वर्षाचे प्रशिक्षण दिले जाते. नौदल आणि हवाई दलामध्ये आता अधिकाधिक तंत्रकुशलता वाढत आहे. कोणत्याही युवकाला किंवा हवाई दलातील सैनिकाला सहा महिन्यात प्रशिक्षण देता येणे शक्य नसल्याचे एडमिरल अरुण प्रकाश यांनी यापूर्वी सांगितले आहे. सात वर्षांपूर्वी भाजपाने त्यांच्या जाहीरनाम्यात जाहीर केले होते की, दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण करून या सात वर्षात १४ कोटी नवीन रोजगार युवकांना मिळणे अपेक्षित होते. हे आश्वासन फोल ठरले असून आता मूळ कायमस्वरूपी जागा लाखो शिल्लक असताना पुन्हा अग्निपथ सारखी योजना केंद्र सरकारने पुढे आणली आहे या योजनेतून भविष्यात युवकांना रोजगार उपलब्ध होणे ऐवजी बेरोजगारीत वाढ होणार आहे असेही काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम म्हणाले.

---

### लवकरात लवकर स्वच्छ पाणी उच्च दाबाने पुरवठा करण्यात यावा

# पाणी टंचाईच्या निषेधार्थ पिंपळे निलखमधील महिलांचा महापालिकेवर हंडा मोर्चा

## अन्यथा पाणी पुरवठा विभागातील अधिकारी, लाईनमन, वॉलमन यांना प्रभागात फिरू दिले जाणार नाही

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपळे निलख भागात दुषीत पाणी पुरवठा होत असल्याच्या निषेधार्थ माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड महापालिकेवर महिलांनी हंडा मोर्चा काढण्यात आला. लवकरात लवकर स्वच्छ पाणी उच्च दाबाने पुरवठा करण्यात यावा अन्यथा पाणी पुरवठा विभागातील अधिकारी, लाईनमन, वॉलमन यांना प्रभागात फिरू दिले जाणार नाही, असा इशारा कामठे यांनी दिला आहे.

तुषार कामठे यांनी महिलांचा हंडा मोर्चा महापालिकेवर आणला असता पालिकेच्या सुरक्षा रक्षकांनी त्यांना आऊट गेटवरच रोखले. आंदोलनकर्त्या महिलांना पालिकेत प्रवेश दिला नाही. हे आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरून पालिकेपर्यंत काढण्यात आले.



कामठे म्हणाले की, पिंपळे निलख, विशाल नगर, कस्पटे वस्ती, वाकड येथे गेल्या ५ वर्षापासुन पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. गेल्या ५ वर्षामध्ये मी ४ वेळा आंदोलन व उपोषण करून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर काही प्रमाणात पाणी सुरळीत चालू झाले. परंतु, गेल्या ४ महिन्यांपासून पुन्हा माघचेच प्रयोग सुरु आहेत. करदात्या नागरीकांना कृत्रिम पाणी टचाईला सामोरे जावे लागत आहे.

परंतु, आज प्रशासनाच्या हातामध्ये सर्व गोष्टी आसताना कृत्रिम पाणीटंचाई होत आहे. ही शोकांतीका आहे. आयुक्त राजेश पाटील यांनी यात लक्ष घालून हा प्रकार थांबवावा. कारण, पाणी टँकरची मुदत संपल्यामुळे पाणी टँकर नागरीकांना मिळत नाही. असा दोन्ही बाजुनी नागरीकांची कोंडी होत आहे. पाणी सुरळीत न झाल्यास पाणीपुरवठा आधिकारी, लाईनमॅन, यांना पिंपळे निलखमध्ये फिरू देणार नाही, असा इशारा कामठे यांनी दिला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेवर महिलांनी हंडा मोर्चा काढण्यात आला. लवकरात लवकर स्वच्छ पाणी उच्च दाबाने पुरवठा करण्यात यावा अन्यथा पाणी पुरवठा विभागातील अधिकारी, लाईनमन, वॉलमन यांना प्रभागात फिरू दिले जाणार नाही, असा इशारा कामठे यांनी दिला आहे.

## संपादकीय »

# हे राज्य जावे ही तर शिवसैनिकांचीच इच्छा!

***राज्यभरातील शिवसैनिक, पदाधिकारी, महिला शिवसैनिक, नगरसेवक, आमदार आणि खासदार यांचे म्हणणे आहे की, तीन पक्षांच्या सरकारमध्ये आपला मुख्यमंत्री असूनही काहीच फायदा नाही. विकासकामे होत नाहीत.***

निधी मिळत नाही. राष्ट्रवादी आणि काँग्रेसकडून मतदारसंघांमध्ये कायम दाबण्याचेच प्रकार होण्यापेक्षा हे सरकार गेले तर बरे होईल. किमान सरकार कोसळल्यानंतर तरी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे पक्षवाढीकडे, संघटनेकडे लक्ष देतील. गेल्या अडीच वर्षांत संघटनेचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. त्यामुळे 'हे राज्य जावे ही तर शिवसैनिकांचीच इच्छा आहे'. कारण राज्य गेले तरच शिवसेना संघटना जिवंत राहील आणि अधिक मजबूत होईल.

अडल्या नडल्यांच्या मदतीला धावून जाणारा कट्टर शिवसैनिक, सर्वसामान्य शिवसैनिकांचा हक्काचा माणूस, शिवसेनेचे ज्येष्ठ नेते, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाराष्ट्राचे राजकारण पार ढवळून निघाले आहे. आपल्यासोबत शिवसेनेच्या ५५ आमदारांपैकी ३९ आमदार घेऊन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या एकूणच कार्यपद्धतीवर नाराज होते. हिंदुत्वाचा नव्याने नारा आळवत एकनाथ शिंदे यांनी आठ दिवसांपूर्वी फडकवलेला बंडाचा झेंडा अजून खाली उतरवलेला नाही. त्यामुळेच शिवसेनेतील यापूर्वीच्या छगन भुजबळ, गणेश नाईक, नारायण राणे, राज ठाकरे यांच्या बंडापेक्षा शिंदे यांच्या बंडाचे गांभीर्य जास्त आहे. तसेच पुढील कित्येक वर्षे या बंडाची चर्चा होईल यात वाद नाही. शिवसेनेतून आजवर अनेक नेते पक्ष सोडून गेले. मात्र, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या निधानानंतरचे शिवसेनेतील हे पहिलेच मोठं बंड असून हे यशस्वी झाल्यास राज्य सरकारच्या स्थिरतेवरही प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळेच शिवसेनापक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची संघटनेवरील पकड ढिली पडली हे या बंडामुळे अधोरेखित झाले. शिवाय मुख्यमंत्री असलेल्या उद्धव ठाकरे यांची खुर्ची डळमळीत केली. तसेच सत्तेतून उतरण्याची नामुष्की ठाकरे घराण्यावर एका कट्टर शिवसैनिकाने आणली याची नोंद इतिहासात होईल हे मात्र नक्की. शिवसेनेला बसलेला हा आजपर्यंतचा सर्वात जबर धक्का म्हणावा लागेल. कारण मागील ५६ वर्षांच्या शिवसेनेच्या इतिहासातील दरारा, भीती आणि जनतेच्या मनातील प्रतिमेचा चक्काचूर झाला आहे.

## आनंदी सकाळ

# 'दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती'

जे जे दिव्य आहे, आदर्श आहे त्याच्यासमोर आपण हात जोडायला हवेत. नतमस्तक व्हायला हवे. त्याही पलीकडे जाऊन, त्या आदर्शाप्रमाणे आचरण करण्याची शपथ घ्यायला हवी; कारण सध्या समाजात नतमस्तक व्हावे अशी माणसे कमी होत असताना, परस्पराप्रती आदरभाव वाढविण्यासाठी एकमेकांना वंदन करीत समाजातील वातावरण आनंददायी करण्याची गरज आहे. दिवसभरात आपण भेटलेल्या बहुतेकांना कळत नकळत नमस्कार करीत असतो. नमस्कार करताना शब्द वेगवेगळे वापरत असलो, तरी भाव मात्र समोरच्या व्यक्तीला आदर देण्याचा असतो. संवादाला अशा चांगल्या कृतीने सुरू केल्यास, पुढील बहुतेक काम सोपे जाते. नातेसंबंधही चांगले राहतात आणि सुधारतातही. समाजात जे चांगले आहेत, मदतीला धावून येतात, आपले हित पाहतात अशांना वंदन करायला हवे. देव देवळात असतो. त्याला वंदन करताना, देवाच्या रूपाने समाजात वावरणाऱ्यांनाही आदर द्यायलाच हवा.

# बंडखोरांना पर्याय कोणता?



## भूमिका



शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी सेना आमदारांचा मोठा लचका तोडून जे बंड पुकारले आहे त्याचे पुढे काय होईल ? यासाठी जे काही कायदेशीर पर्याय पुढे येत आहेत त्यात फुटीर आमदारांनी कोणत्यातरी राजकीय पक्षात विलीन व्हावे असा एक पर्याय सांगितला जात आहे. शिवसेना उपनेत्या आणि विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही याच बाबत सूतोवाच केले आहे.सभागातूहत फुटीर आमदारांना वेगळा गट म्हणून मान्यता मिळणे कठीण असल्याने त्यांना भाजप किंवा प्रहार या पक्षात जावे लागेल असेही गोऱ्हे विविध मंचावरून सांगायला लागल्या आहेत.दरम्यान शिंदे आणि राज ठाकरे यांच्यात फोनवरून दोनवेळा चर्चा झाल्याची माहिती माध्यमांनी दिली आहे याची संगती लावण्याचा प्रयत्न राजकीय क्षेत्रात केला जात आहे. एकनाथ शिंदे यांच्यासोबत सेनेतून बाहेर पडणाऱ्या आमदारांना कोणती दारे उघडी आहेत हे सांगताना नीलम गोऱ्हे मनसे या पक्षाचे मुद्दाम नाव घेत नाहीत,कारण ही आयती रसद राज ठाकरेंच्या मदतीला जाऊन उद्धव ठाकरे यांची डोकेदुखी वाढेल अशी भीती नक्कीच त्यांना आहे म्हणून त्यांनी राजकीय चतुराई वापरत फुटीर आमदारांना केवळ दोनच मार्ग दाखवले आहेत.शिंदे त्यांच्यापेक्षा हुशार निघाले आहेत,जेव्हा कुठल्यातरी पक्षात विलीन होण्याशिवाय पर्याय उरणार नाही अशी निर्णायक वेळ आलीच तर ते राज ठाकरे यांच्या मनसेचा पर्याय चाचपडून ठेवत असावेत असे दिसते.एखाद्या पक्षातच जायचे म्हटल्यास चारी अंगांनी विचार करून निर्णय घेणे शहाणपणाचे ठरणार आहे.

गुवाहाटी मध्ये मुक्कामी असणाऱ्या चार दोन ग्रामीण आमदारांनी बच्चू कडू यांच्या प्रहार मध्ये जायला काय हरकत आहे अशी तयारी दाखवली असली तरी त्यावर अद्याप कुणाचे एकमत झाले नाही,ते होईल असेही वाटत नाही.मुळात शिंदे यांनी हे बंड करताना जो हिंदुत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला तो महत्वाचा आहे. या शिवाय बाळासाहेब ठाकरे यांचे दैवत म्हणून स्थान त्यांना अबाधित ठेवायचे आहे या दोन्ही गोष्टी प्रहार हा पर्याय स्वीकारून पूर्ण होत नाहीत त्यासाठी राज ठाकरे म्हणजे मनसे हाच उत्तम पर्याय असू शकतो.

# वड्याचं तेल वांग्यावर नको!

**शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील होऊन गुवाहाटीला तळ ठोकून असलेल्या ४० हून अधिक आमदारांमुळे महाराष्ट्रातील ठाकरे सरकार अस्थिर झालंय.**

शिवसेनेच्या एकूण आमदारांपैकी दोन तृतीयांशहून अधिक आमदारांचे संख्याबळ जवळ असल्याने शिवसेना आमचीच असा छातीठोक दावा आता शिंदे गटाकडून करण्यात येऊ लागलाय. यातील तांत्रिक वा कायदेशीर बाबी निकाली लागल्यानंतरच शिवसेना नेमकी कुणाची? ठाकरेंची की शिंदेंची हे स्पष्ट होईल. या साऱ्या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी पक्षाची खरी ताकद असलेले पदाधिकारी आणि शिवसैनिकांना भावनिक साद घातली. एका बाजूला विधिमंडळात सत्तेपेक्षाही अस्तित्व टिकवून ठेवण्याचं आव्हान पेलताना शिवसैनिकांचं पाठबळ तरी आपल्या मागे कायम रहावं याचा आटोकाट प्रयत्न आता ठाकरे कुटुंबाकडून करण्यात येतोय. त्याचाच भाग म्हणून उद्धव ठाकरे यांच्या भाषणाकडं बघावं लागेल.



उद्धव ठाकरे एका बाजूला भाषण करत असतानाच त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे यांनी दाद न देणारे बंडखोर आमदारांच्या पत्नींना फोन करून भावनिक साद घालायला सुरुवात केली. आतापर्यंत आपण एक कुटुंब म्हणून एकत्र होतो. इथून पुढंही राहू, असं आश्वासन त्यांना त्या देत आहेत. यावरून ही लढाई विधिमंडळासोबतच कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गरज पडलीच तर रस्त्यावर उतरून आणि किचन कॅबिनेटमधूनही लढण्याचा चंग ठाकरे कुटुंबाने बांधलाय. जसजशी परिस्थिती वळणं घेत राहील, तसतशी ही रणनीती प्रभावी ठरतेय की नाही, हे दिसून येईल, मात्र ठाकरे कुटुंब अशा अवघड स्थितीत लवकर हार मानणार नाही, हे मात्र अगदी स्पष्ट दिसतंय. उद्धव ठाकरे यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून बुधवारी मुख्यमंत्री या भूमिकेतून महाराष्ट्रातील जनतेशी संवाद साधला होता. या संवादावेळी त्यांनी कोरोनाच्या संकटकाळात मुख्यमंत्री म्हणून केलेल्या कामगिरीचे दाखले जनतेला दिले होते.

कोरोना संकटात त्यांनी याचप्रकारे सातत्याने जनतेशी संवाद साधत एक कनेक्ट तयार केला होता. प्रत्येकाच्या घरातील सदस्य या वाक्यावर भर देत त्यांनी वर्षा बंगला सोडण्याआधी याच संवाद तारेला छेडून लोकांच्या मनात आपुलकीची भावना तयार करण्याचा प्रयत्न केला. सोबतच बंडखोर आमदारांना उद्देशून समोरासमोर येऊन मागणी केल्यास मुख्यमंत्रिपद सोडायची तयारीदेखील दाखवली होती.

## ।। अभंगवाणी ।।



सावध जालों सावध जालों ।  
हरिच्या आलों जागरणा ॥१॥  
तेथें वैष्णवांचे भार ।  
जयजयकार गर्जतसे ॥धृ.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव

। मुंबई । कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने राज्यांना पत्र पाठवले आहे. या पत्रातून राज्यांना खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. देशभरात गेल्या 24 तासात 11 हजार 793 नवीन कोरोनाबाधितांची नोंद झाली आहे. तसेच, कोरोनाच्या एकूण रुग्णांची संख्या 4 कोटी 34 लाख 18 हजार 839 झाली आहे. कोरोनाचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी आगामी सणासुदीचा काळ लक्षात घेऊन पाच कलमी कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याबाबत सांगितल्याचे समजते. या कलमांतर्गत राज्यांनी कोरोना चाचणी, ट्रॅकिंग, उपचार आणि लसीकरण या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

# "खरे शिवसैनिक असाल तर पुरग्रस्तांना मदत कराल..."

## बंडखोर आमदारांना आदित्य ठाकरेंचा खोचक टोला

। मुंबई । महाईन्यूज ।



मागील एक आठवड्यापासून महाराष्ट्रात सत्तासंघर्ष सुरू आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली असून ते ४० हून अधिक शिवसेना आणि अपक्ष आमदारांना घेऊन आसाममधील गुवाहाटी याठिकाणी गेले आहेत. पण आसाममध्ये सध्या पूरस्थिती आहे. ३५ पैकी ३२ जिल्ह्यांना पुराचा फटका बसला असून जवळपास ५५ लाख नागरिकांचं जनजीवन विस्कळीत झालं आहे. या सर्व पार्श्वभूमीवर पर्यावरण मंत्री आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी शिवसेनेच्या आमदारांना खोचक टोला लगावला आहे. सध्याच्या राजकीय स्थितीबाबत माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, "मुख्यमंत्र्यांनी केलेलं आवाहन आपण सर्वांनी ऐकलं असेलच. माझं अजूनही एवढंच मत आहे की, जे कुणी तिकडे गुवाहाटीत आहेत. माझी हीच अपेक्षा असेल ते खरोखर शिवसैनिक असतील तर त्यांनी गुवाहाटीत आजुबाजूला पूर आलेल्या स्थळी जावं आणि लोकांची सेवा करावी. एकीकडे आसाममध्ये पूर आला असताना, कोण एवढं मजा करायला लावतंय, मला माहीत नाही," असंही आदित्य ठाकरे म्हणाले.

दुसरीकडे, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मात्र बंडखोर शिवसेना आमदारांना पुन्हा माघारी येण्याचं आवाहन केलं आहे. कुटुंबप्रमुख म्हणून तुम्हाला मनापासून सांगतो अजूनही वेळ गेलेली नाही. माझं आपल्याला सगळ्यांना आवाहन आहे, आपण या माझ्यासमोर बसा, शिवसैनिकांच्या आणि जनतेच्या मनातील संभ्रम दूर करा असं उद्धव ठाकरेंनी बंडखोर आमदारांना सांगितलं आहे.

### उद्धव ठाकरे नेमकं काय म्हणाले...

"आपण गेल्या काही दिवसांपासून गुवाहाटी येथे अडकून पडलेले आहात. आपल्याबाबत रोज नवीन माहिती समोर येत आहे. आपल्यातील बरेच संपर्कातही आहेत. आपण आजही मनाने शिवसेनेत आहात. आपल्यापैकी काही आमदारांच्या कुटुंबातील सदस्यांनी देखील संपर्क साधून आपल्या मनातील भावना मला कळवल्या आहेत. आपल्या भावनांचा मी शिवसेनेचा कुटुंबप्रमुख म्हणून आदर करतो," असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

### शिवसेना नेते आदित्य ठाकरे

सध्याच्या राजकीय स्थितीबाबत माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, "मुख्यमंत्र्यांनी केलेलं आवाहन आपण सर्वांनी ऐकलं असेलच. माझं अजूनही एवढंच मत आहे की, जे कुणी तिकडे गुवाहाटीत आहेत. माझी हीच अपेक्षा असेल ते खरोखर शिवसैनिक असतील तर त्यांनी गुवाहाटीत आजुबाजूला पूर आलेल्या स्थळी जावं आणि लोकांची सेवा करावी.

# कुर्ला इमारती दुर्घटनेतील मृतांचा आकडा 19 वर

## राज्य सरकारकडून मृतांना 5 लाखांची आर्थिक मदत

। नवी मुंबई । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी



कुर्ला, नाईक नगर सोसायटी येथील जिल्हाधिकारी यांच्या जागेवरील ४० – ५० वर्षे जुन्या धोकादायक चार इमारतींपैकी दोन इमारत (डी विंग) सोमवारी रात्री ११.४० वाजताच्या सुमारास अचानक कोसळली. या दुर्घटनेत एकूण ३२ जण जखमी झाले. त्यापैकी गंभीर जखमी १९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर उर्वरित १४ जखमींपैकी १० जणांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. तर ४ जण रुग्णालयांत उपचार घेत आहेत.

कोसळलेल्या इमारतीचा ढिगारा उपसण्याचे काम मंगळवारी संध्याकाळी उशिरापर्यन्त सुरूच होते. १० जखमींपैकी ९ जखमीवर नजीकच्या राजावाडी रुग्णालयात व १ जखमींवर सायन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र राज्याचे पर्यावरण व पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी, मध्यरात्री ३ वाजता व मंगळवारी दुपारी ३.३० वाजता घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली. तसेच, इमारत दुर्घटनेबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.

या दुर्घटनेबाबत प्राप्त माहितीनुसार, कुर्ला ( पूर्व), शिवसृष्टी रोड, एस. टी. डेपोजवळ, नाईक नगर सोसायटी येथे जिल्हाधिकारी यांच्या जागेवर ४० – ५० वर्षे जुन्या चार मजली चार खासगी इमारती आहेत. या इमारतींमध्ये बंजारा समाजाची लोक अनेक वर्षांपासून राहत होती. मात्र नंतर त्यांनी सदर इमारतीमधील खोल्या भाड्याने लोकांना दिल्या होत्या. त्यामध्ये बहुतेक कामगार लोक होते.

या इमारती जुन्या असल्याने व इमारतीचे बांधकाम हे धोकादायक स्थितीत असल्याने मुंबई महापालिकेने सदर इमारती तात्काळ खाली करण्याबाबत या इमारतींना वेळोवेळी नोटिसा बजावल्या होत्या. तसेच, या इमारतींचा वीज व पाणी पुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात आली होती. मात्र सदर इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांनी इमारत काही कारणास्तव इमारती खाली केल्या नाहीत, अशी माहिती माजी नगरसेविका प्रवीणा मोरजकर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना दिली.

सोमवारी रात्री ११.४० वाजताच्या सुमारास सदर चार इमारतीपैकी दोन इमारती पत्त्यासारख्या अचानकपणे कोसळलेल्या. या दोन्ही इमारती एकमेकांना जोडलेल्या असल्याने एक इमारत पूर्णपणे जमीनदोस्त झाली तर दुसरी इमारतही कोसळली मात्र या इमारतीचे खालील दोन मजले पूर्णपणे भुईसपाट झाले व शेवटचे दोन मजले त्या खालील ढिगाऱ्यावर स्थिर राहिले.

या दोन्ही इमारती कोसळण्याच्या आवाजाने परिसरात एकच खळबळ उडाली व आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी, स्थानिकांनी अग्निशमन दल पोहोचण्यापूर्वीच सदर कोसळलेल्या इमारतीच्या शेवटच्या दोन मजल्यावर अडकलेल्या काही रहिवाशांची साडीचा दोरखंड बनवून सुखरूप सुटका केल्याने ते बचावले. या घटनेत एकूण ३३ जण जखमी झाले असून त्यापैकी १९ जण मृत पावले असून उर्वरित ४ जण सायन व राजावाडी या रूग्णालयात उपचार घेत आहेत.

दुर्घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, पालिका यंत्रणा व अग्निशमन दल तात्काळ पोहोचले व त्यांनी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले. मात्र घटनेची भीषणता पाहता पावसाळ्यातील दुर्घटनात मदतीसाठी अगोदरच सुसज्ज ठेवण्यात आलेल्या 'एनडीआरएफ' पथकाला अधिकच्या मदतीसाठी पाचारण करण्यात आले होते. घटनास्थळी, अग्निशमन दलाच्या १२ गाड्या, २ रेस्क्यू व्हॅन, जवान, अधिकारी, 'एनडीआरएफ' पथक, पालिकेचे कनिष्ठ अभियंते, मुकादम, २८ कामगार, ५ जेसीबी, १ लॉरी आदींच्या साहाय्याने मंगळवारी सायंकाळी उशीरापर्यंत बचावकार्य युद्धपातळीवर केले.

### कुर्ला इमारत दुर्घटनेतील मृतांची नावे

(१) अनिल यादव (२१), (२) अरविंद राजेंद्र भारती (१९), (३)रमेश नागसी बडीया (५०), (४) प्रल्हाद गायकवाड (६५), (५)लिलाबाई प्रल्हाद गायकवाड (६०) , (६)अजिंक्य गायकवाड (३४), (७) श्याम प्रजपती (१८), (८)कुशर प्रजापती (२०), (९)सिकंदर राजभर (२१) (१०) अनुप राजभर (१८), (११अनोळखी (३०), (१२)अनोळखी (३५), (१३) अजय भोले पासपोर (२८), (१४)गुड्डू पासपोर (२२), (१५) बिरजू माझी (२१), (१६)राहुल माझी (२४), (१७) पप्पू माझी (३५), (१८)महेश माझी (४०)

### आदित्य ठाकरे कोसळलेल्या इमारतीच्या ठिकाणी

राज्यात सत्तेवरील महाविकास आघाडी सरकार कोसळत असताना त्याची चिंता बाजुला ठेवून राज्याचे पर्यटन व पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास इमारत दुर्घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली व सदर घटनेबाबत माहिती जाणून घेतली, अशी माहिती माजी नगरसेविका प्रवीणा मोरजकर यांनी दिली. प्रविणा मोरजकर या घटनेची माहिती मिळताच तात्काळ घटनास्थळी पोहोचल्या. रात्रभर त्या घटनास्थळी उपस्थित होत्या. त्या मंगळवारी सकाळी ६ वाजता घरी परतल्या.

## शॉर्ट न्यूज »

### मुकेश अंबानींनी जिओच्या संचालकपदाचा दिला राजीनामा



। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

रिलायन्स समूहाचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी जिओ टेलिकॉमच्या संचालकपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचाजागी आता अंबानी यांचा मुलगा आकाश अंबानी यांना जिओच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीच्या बोर्डाने आकाश अंबानी यांच्या नियुक्तीला मान्यता दिली आहे. दरम्यान, जिओ ही देशातील आघाडीची 4G दूरसंचार सेवा प्रदाता आहे. कंपनीने हा बदल सेबीलाही कळवला आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये मुकेश अंबानी यांनी कंपनीच्या नेतृत्वात बदलाबाबत बोलले होते. मोठे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नवे नेतृत्व पुढे आणावे लागेल, असे ते म्हणाले होते.

# शिवसेनेचे तुकडे तुकडे झाले आहेत!

## किरीट सोमय्यांची उद्धव ठाकरेंवर खोचक टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे महाविकास आघाडी सरकार अस्थिर झाले असून बंडखोर आमदारांवर शिवसेना नेत्यांकडून जहरी टीका केली जात आहे. याचपार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते संजय राऊत सातत्याने बंडखोर आमदारांबरोबरच भाजपवरही हल्लाबोल करत आहेत. त्यावर आता भाजप नेते किरीट सोमय्या) यांनी खोचक टीका केली असून शिवसेनेचे तुकडे तुकडे झाले आहेत. एक तुकडा इधर, एक तुकडा उधर आणि उद्धव ठाकरेंकडे राहिलेल्या हिश्श्यातला जो तुकडा आलाय त्यात एक डझन आमदाराही दिसत नाहीत असे त्यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंसह संजय राऊत आणि शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांकडून होत आहे. याच रागातून राऊत रोज बंडखोरांच्या इतिहासाचा पाढा वाचत आहेत. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनातील अग्रलेखातही राऊत भाजप आणि बंडखोरांचा समाचार घेत आहेत. पण एवढे करुनही शिवसेना एकाकी पडल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे इतके दिवस मौन असलेले भाजप नेते आता सक्रिय झाले असून किरिट सोमय्या यांनी आज मीडियाबरोबर बोलताना संजय राऊतांनी केलेल्या वक्तव्यांवर टीका केली. दरम्यान राऊतांना ईडीने समन बजावले असून त्यांनी कार्यक्रमाचे कारण देत चौकशी पुढे करण्यासाठी ईडीकडे वेळ मागितली.

एकनाथ शिंदे यांनी बंड केल्याने शिवसेनेचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. ४० हून अधिक आमदार शिंदे सोबत गेल्याने राज्यभरात शिवसेना नेत्यांसह शिवसैनिकही आक्रमक झाले आहेत. यातून दररोज शिंदे गट विरुद्ध उद्धव गटामध्ये आरोप प्रत्यारोप होत आहेत. तर या बंडाळीमागे भाजपचा हात असल्याचा आरोप मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंसह संजय राऊत आणि शिवसेनेच्या ज्येष्ठ नेत्यांकडून होत आहे. याच रागातून राऊत रोज बंडखोरांच्या इतिहासाचा पाढा वाचत आहेत. शिवसेनेचे मुखपत्र असलेल्या सामनातील अग्रलेखातही राऊत भाजप आणि बंडखोरांचा समाचार घेत आहेत. पण एवढे करुनही शिवसेना एकाकी पडल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे इतके दिवस मौन असलेले भाजप नेते आता सक्रिय झाले असून किरिट सोमय्या यांनी आज मीडियाबरोबर बोलताना संजय राऊतांनी केलेल्या वक्तव्यांवर टीका केली. दरम्यान राऊतांना ईडीने समन बजावले असून त्यांनी कार्यक्रमाचे कारण देत चौकशी पुढे करण्यासाठी ईडीकडे वेळ मागितली. त्यावर ईडीने त्यांना १४ दिवसांची वेळ दिली आहे. यावरही सोमय्या यांनी निशाणा साधला. ते म्हणाले की "किती दिवस लांब राहणार? किती दिवस लपणार? पत्राचाळ प्रकरणाचा ठिकाणा नाही. टीएमसी बँक, डीएचएफएल, वाधवान अशा प्रकरणांमध्ये जे पैसे लुटले गेले आहेत, त्यांचा हिशोब प्रवीण राऊतांना द्यावा लागेल. राहुल गांधींना चारवेळा जावं लागलं, अनिल परब चार वेळा गेले. राऊतांना हिशोब द्यावाच लागेल.

तसेच यावेळी सोमय्या यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांवरही निशाणा साधला. सामना अग्रलेखात महाराष्ट्राला तीन तुकड्यांमध्ये विभागण्याचा डाव असल्याचा भाजपवर आरोप करण्यात आला आहे. त्यावर सोमय्या म्हणाले की "शिवसेनेचेच तुकडे तुकडे झाले आहेत. एक तुकडा इधर, एक तुकडा उधर . उद्धव ठाकरेंकडे राहिलेल्या हिश्श्यात जो तुकडा आला, त्यात एक डझनही आमदार नाहीयेत. आधी त्याच्याकडे बघा. १० दिवसांपूर्वीपर्यंत शिवसेनेचे आमदार म्हणायचे, आमचे नेता उद्धव ठाकरे नॉट रीचेबल आहेत.

# विधानसभेत अग्निपथ योजनेविरोधात ठराव आणणार

## मुख्यमंत्री मान यांची मोठी घोषणा

। चंदीगढ । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी केंद्र सरकारनं (Central Government) सुरु केलेल्या नवीन अग्निपथ योजनेचा (Agneepath Scheme) निषेध नोंदवलाय. या योजनेविरोधात विधानसभेत ठराव आणला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलंय. विरोधी पक्षनेते प्रताप सिंह बाजवा यांनी अग्निपथ योजनेबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सीएम मान यांनी ही माहिती दिलीय.

हा प्रस्ताव सर्वसहमतीनं आणणार असल्याचं त्यांनी सांगितलंय. आपण अग्निपथ योजनेच्या विरोधात असल्याचं मुख्यमंत्री मान म्हणाले. 17 वर्षांची मूलं सैन्यात भरती होऊन 21 व्या वर्षी माजी सैनिक होतील, हे खूप दुःखदायक आहे. या वयात त्यांचं लग्नही झालं नसेल. शिवाय, लष्करातून बाहेर पडल्यानंतर कॅन्टीनमधून साहित्य नेण्याची सुविधाही त्यांना घेता येणार नाहीय.

ते पुढं म्हणाले, तरुण वयाच्या 35 व्या वर्षापर्यंत कठोर परिश्रम करून सैन्यात भरती होतात, तर नवीन योजनेनुसार त्यांना एवढ्या मेहनतीनंतर 4 वर्षांनीच सैन्यातून माघार घ्यावी लागणार आहे. मुख्यमंत्र्यांसमोर विरोधी पक्षनेते प्रताप बाजवा यांनीही अग्निपथ योजनेच्या विरोधात सर्व राजकीय पक्षांनी एकमत व्हायला हवं, असं सांगितलं. त्याविरोधात विधानसभेत एकमतानं ठराव करावा.



### अग्निपथ योजनेत 4 वर्षांची भरती

अग्निपथ योजनेंतर्गत अग्निवीरांची सैन्यात 4 वर्षांसाठी भरती केली जाईल. पहिल्या वर्षी त्यांना दरमहा सुमारे 30,000 रुपये पगार मिळेल. मग त्यात दरवर्षी 10 टक्क्यांनी वाढ होईल, म्हणजेच त्यांचा पगार दुसऱ्या वर्षी 33,000, तिसऱ्या वर्षी 36,500 आणि चौथ्या वर्षी 40,000 रुपये होईल. दरम्यान, त्यांच्या पगारातील सुमारे 30% रक्कम सेवा निधी निधीसाठी दरमहा कापली जाईल. सेवेच्या शेवटी म्हणजेच 4 वर्षांनंतर, सरकार प्रत्येक अग्निवीरला एकूण 11.77 लाख रुपयांपर्यंतची रक्कम देईल. चार वर्षांनंतर, सुमारे 25 टक्के अग्निवीरांना पुढील सेवेसाठी कायम केलं जाईल.

# जगभरातील मंदीमुळे भारताला होईल फायदा

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एकीकडे जगात मंदीचा धोका वाढत आहे. दुसरीकडे जागतिक मंदीमुळे भारताला (India) कमी आणि जास्त फायदा होऊ शकतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. मंदीच्या वाढत्या चिंतेमध्ये सिटीग्रुपचे भारताचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य अर्थशास्त्रज्ञ समीरन चक्रवर्ती यांनी मोठी आशा व्यक्त केली आहे. भारत हा विविध वस्तूंचा मोठा आयातदार देश आहे. त्यामुळे जगातील मंदीच्या काळात महागाईच्या आघाडीवर देशाला फायदा होऊ शकतो, असे मुलाखतीत समीरन चक्रवर्ती म्हणाले. या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या अहवालात म्हटले आहे की, मंदीच्या वातावरणात जागतिक वस्तूंच्या किमतीत काही प्रमाणात कपात केल्यास



देशांतर्गत चलनवाढ कमी होण्यास मदत होऊ शकते.

गेल्या काही वर्षांपासून जगावर सातत्याने संकटे आलीत. कोरोना साथीच्या रोगाने संपूर्ण मानवी जीवन उद्ध्वस्त झाले. गेल्या अडीच वर्षांत जगभरातील अर्थव्यवस्था ठप्प झाली. चलनातील पैशाचा वापर करून उत्पादक कामे पार पाडणे, याविषयीचे धोरण आखून ते राबवले तर महागाई नियंत्रणाच्या प्रयत्नांना बळ मिळेल. यासोबतच त्यांनी मंदीच्या धोक्याबाबत आपल्या चिंताही मांडल्या आहेत. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर मायकेल पात्रा यांनीही यापूर्वी महागाईबाबत चिंता व्यक्त केली होती.

# उदयनराजे भोसलेंना 'भिरकीट'ची भुरळ

हसताहसता मनाला स्पर्श करून जाणारा चित्रपट म्हणजे 'भिरकीट'. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात चित्रपटसृष्टीतील सगळे विनोदवीर आहेत. त्यामुळे हा एक धमाल चित्रपट बनला आहे. मनोरंजनासोबतच एक खूपच महत्वाचा संदेश देणाऱ्या अनुप जगदाळे दिग्दर्शित 'भिरकीट'ला समीक्षकांसह प्रेक्षकांनीही पसंती दर्शवली असून आता यात आणखी एक मोठे नाव सामील झाले आहे. भाजप खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांनी आपल्या काही निकटवर्तीयांसह 'भिरकीट' हा चित्रपट नुकताच साताऱ्यात पाहिला. उदयनराजे यांनी या चित्रपटाचे भरभरून कौतुक केले आहे.

केवळ कौतुक नाही तर प्रत्येक प्रेक्षकाने हा चित्रपट पाहावा आणि याकरता साताऱ्यातील चित्रपटगृहात या चित्रपटाचे शो काही दिवस अजून ठेवावेत, असे आवाहनही यावेळी केले आहे. चित्रपटाबद्दल उदयनराजे भोसले म्हणतात, माझ्या काही परिचयाच्या लोकांनी 'भिरकीट' हा चित्रपट पाहिला आणि त्यांच्याकडून आलेल्या चित्रपटाबद्दलच्या प्रतिक्रिया ऐकून चित्रपट पाहण्याची इच्छा अधिकच तीव्र झाली. नुकताच हा चित्रपट पाहिला असून खूपच सुंदर अशी या चित्रपटाची बांधणी केली आहे." पुढे उदयनराजे म्हणाले, "भिरकीट मधील प्रत्येक कलाकाराने उत्कृष्ट अभिनय केला आहे. चित्रपटातील प्रत्येक व्यक्तिरेखा आपल्या आसपास वावरत असते, हे चित्रपट पाहताना प्रकर्षाने जाणवते. काळासोबत पुढे जाताना माणूस माणुसकी मागे सोडत आहे, हेच खूप उत्तमरित्या यात मांडले आहे.




# ७६ वर्षीय आजींचा भन्नाट डान्स



आजींचा हा भन्नाट डान्स सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.आजकाल डान्स म्हटलं की तरुणाईमध्ये कमालीचा उत्साह दिसतो. टीव्हीवर अनेक डान्स रिअलिटी शो लोकप्रिय होताना दिसतात. अलिकडेच झी टीव्हीवर 'डीआयडी सुपरमॉम'चं नवं पर्व सुरू झालं आहे. ज्यात महिला स्पर्धक आपल्या डान्स परफॉर्मन्सनं प्रेक्षकांची मनं जिंकून घेताना दिसत आहेत. मात्र या शोमधील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर बराच चर्चेत आहे. कारण या शोमध्ये ७६ वर्षांच्या मराठमोळ्या आजींनी डान्स करत सर्वांनाच चकीत केलं आहे. आजींचा हा भन्नाट डान्स सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहे.

'डान्स इंडिया डान्स'च्या मंचावर नुकतीच एका आजींनी हजेरी लावली. लक्ष्मी असं त्यांचं नाव आहे आणि त्यांचा 'डीआयडी'च्या मंचावर डान्स करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होताना दिसत आहे. या व्हिडओमध्ये या आजी परीक्षक रेमो डिसुझा, उर्मिला मातोंडकर आणि भाग्यश्री यांच्यासोबत धम्माल डान्स करताना दिसत आहेत. ७६ वर्षीय या आजींचा डान्स पाहून प्रेक्षकांसोबत परीक्षकही भारावून गेलेले दिसत आहे. लक्ष्मी आजींनी 'झिंगाट' गाण्यावर भन्नाट डान्स केला. पण यासोबत त्यांनी 'सौदा खरा खरा' या पंजाबी गाण्यावर भांगडा देखील केला. या आजींच्या धम्माल डान्सचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर चर्चेत आहे. आजींचा डान्स करतानाचा उत्साह आजकालच्या तरुणाईलाही लाजवेल असाच आहे.

# 'जुग जुग जियो'ला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद



बॉलिवूड अभिनेता वरूण धवन, कियारा अडवाणी, अनिल कपूर आणि नीतू कपूर यांचा 'जुग जुग जियो' चित्रपट २४ जून रोजी प्रदर्शित झाला. या चित्रपटाने पहिल्या दिवसापासून चांगली कमाई करायला सुरूवात केली आहे. आत्तापर्यंत या चित्रपटाने ३६ कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे. या चित्रपटाने पहिल्या दिवशी ९.२८ कोटींची कमाई केली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी १२.५५ कोटींची कमाई केली होती. तरण आदर्शने वरूण धवन आणि कियारा अडवाणीच्या 'जुग जुग जियो' चित्रपटाची तिसऱ्या दिवसाची कमाई आपल्या ट्वीटर अकाउंटवर शेअर केली आहे. या चित्रपटाने शुक्रवारी ९.२८ कोटी कमावले होते. तसेच शनिवारी चित्रपटाने १२.५५ कोटी रूपये कमावले होते. तिसऱ्या दिवशी १५.१० कोटी रूपये कमावले होते.तसेच या चित्रपटाने विकेंड्च्या शेवटपर्यंत ३६.९३ कोटींची कमाई केली आहे. वरूण धवन आणि कियारा अडवाणीच्या 'जुग जुग जियो' चित्रपटाने आत्तापर्यंत जवळपास ३६.९३ कोटींची कमाई केली आहे.

# जगण्याला नवी दिशा देणाऱ्या 'अनन्या'चा ट्रेलर प्रदर्शित

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट, ड्रीमव्हीवर एंटरटेनमेंट आणि रवी जाधव निर्मित 'अनन्या' येत्या २२ जुलै रोजी चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'शक्य आहे, तुम्ही जे ठरवाल ते शक्य आहे!', असे म्हणणाऱ्या 'अनन्या'च्या जिद्दीचा प्रवास यात पाहायला मिळणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून एका क्षणी मन सुन्न करणारा हा ट्रेलर क्षणार्धात मनाला जगण्याची नवी उमेद देणाराही आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन प्रताप फड यांनी केले असून 'अनन्या'ची




व्यक्तिरेखा हृता दुर्गुळे साकारत आहे. तर ध्रुव दास, रवी जाधव आणि संजय छाब्रिया 'अनन्या'चे निर्माते आहेत.

ट्रेलरमध्ये आपल्या स्वप्नांची पूर्तता करण्यासाठी धडपडणारी, आयुष्य दिलखुलास जगणारी 'अनन्या' दिसत आहे. एका अपघातात तिचे दोन्ही हात जातात. मात्र 'अनन्या' पुन्हा एकदा स्वतःच्या पायावर उभी राहताना यात दिसत आहे. नावाप्रमाणेच इतरांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या 'अनन्या'चा एक प्रेरणादायी प्रवास यात दिसत असून 'शक्य आहे, तुम्ही जे ठरवाल ते शक्य आहे!' हा खूप मोलाचा सल्ला देणारा हा चित्रपट आहे. दिग्दर्शक प्रताप फड 'अनन्या'बदल म्हणतात," गेल्या अनेक वर्षांपासून 'अनन्या' ला मी नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या समोर सादर केले.

# धर्मवीर' चित्रपटाच्या पडद्यामागचा एकनाथ शिंदेंसोबतचा 'तो' किस्सा

"तुला जी मदत लागेल ती मी...", मंगेश देसाईंनी सांगितलं'धर्मवीर' या चित्रपटाची निर्मितीची धुरा सांभाळलेल्या अभिनेता मंगेश देसाई यांचा आज वाढदिवस आहे. मंगेश आज त्यांच्या वयाच्या पन्नाशीत पदार्पण करत आहेत. मंगेश यांना आज लोक 'क्राईम पॅट्रोल' मालिकेमुळे ओळखतात. सध्या ते धर्मवीर या चित्रपटामुळे चांगलेच चर्चेत आले आहेत. हा चित्रपट 'धर्मवीर' आनंद



दिघे यांच्या आयुष्यावर आहे. या चित्रपट्च्या प्रमोशवेळी एका मुलाखतीत मंगेश देसाईंनी या चित्रपटाच्या पडद्यामागचे अनेक किस्से आणि आठवणी शेअर केल्या.

## शॉर्ट न्यूज »

### विजयासाठी जोकोविचचा संघर्ष



मुंबई । महाईन्यूज

सर्वाधिक २० ग्रँडस्लॅम जिंकणारा तसेच अव्वल मानांकित असलेल्या नोवाक जोकोविचला विम्बल्डन टेनिस ग्रँडस्लॅमची दुसरी फेरी गाठण्यासाठी संघर्ष करावा लागला. दक्षिण कोरियाच्या २४ वर्षीय सूनवू क्यॉन याने जोकोविचला कडवी झुंज दिली; मात्र गतविजेत्या जोकोविचने ही लढत ६-३, ३-६, ६-३, ६-४ अशा फरकाने जिंकली व पुरुषांच्या एकेरीत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. या स्पर्धेचे सलग चौथे विजेतेपद जिंकण्याच्या इराद्याने टेनिस कोर्टवर उतरणाऱ्या जोकोविच याने पहिला सेट ६-३ अशा फरकाने जिंकला आणि दमदार सुरुवात केली; मात्र दुसऱ्या सेटमधील चौथ्या गेममध्ये क्यॉनने जोकोविचची सर्व्हिस मोडली. हा सेट ६-३ अशा फरकाने जिंकला, पण पुढील दोन सेटमध्ये कोरियाच्या टेनिसपटूला जोकोविचचे आव्हान परतवून लावता आले नाही.

# मालिका जिंकण्यासाठी टीम इंडिया सज्ज!

## पहिल्या विजयानंतर हार्दिक पंड्याने साधला माध्यमांशी संवाद

। बंगळूरु । महाईन्यूज ।



पावसाचा व्यत्यय आलेल्या पहिल्या ट्रेन्टी-20 सामन्यात विजय मिळवल्यानंतर भारतीय संघ आता आज होणाऱ्या दुसऱ्या सामन्यासह मालिका जिंकण्याच्या तयारीत आहे. रविवारी झालेल्या पहिल्या सामन्यात जे मनात होते ते सगळे घडले, असे मत कर्णधार हार्दिक पंड्याने व्यक्त केले. अपेक्षेप्रमाणे भारतीय संघाने आयर्लंड संघाचा पहिल्या टी-20 सामन्यात सहज पराभव केला. पावसाच्या व्यत्ययामुळे सामन्यातील प्रत्येक संघाची 8 षटके पंचांना कापावी लागली. या निराशेपेक्षा 12-12 षटकांचा सामना झाला. याचा प्रेक्षकांनी आनंद व्यक्त केला आणि संयोजकांनी सुटकेचा श्वास सोडला. सामन्यातील कामगिरीवरून कप्तान हार्दिक पंड्याबरोबर माध्यमांनी संवाद साधला असता तो पहिल्या सामन्यातील खेळावरून समाधानी दिसला. आयपीएल विजेता कर्णधार हार्दिक पंड्याने प्रथमच देशाचे नेतृत्व केले आणि संघाला शानदार विजय मिळवून दिला. या पहिल्या सामन्याबाबत बोलताना हार्दिक म्हणाला, दोन वेळा जोरदार पाऊस आला. संयोजकांची पळापळ झाली. पाऊस थांबला नाही तर सामनाच होणार नाही असे विचारही मनात येऊन गेले. सुदैवाने पाऊस थांबला आणि सामना चालू झाला. प्रेक्षकांचा उत्साह बघता सामना होणे गरजेचे होते, असे हार्दिक पंड्या म्हणाला.

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करायचा निर्णय घेतला, कारण खेळपट्टी नक्की कशी आहे याचा पूर्ण अंदाज लागत नव्हता. खेळाच्या सुरुवातीला चेंडू किंचित थांबून येत होता. नंतर खेळपट्टी फलंदाजीकरता मस्त झाली. भुवनेश्वर कुमारने चांगली सुरुवात करून दिल्यावर सगळे सुरळीत घडत गेले. मान्य आहे, की मी, उमरान मलिक आणि आवेश खानकडून चेंडूची दिशा अगदी बरोबर नव्हती.

### मलेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा

# सिंधू, प्रणॉयवर भारताची मदार

। क्वॉलालंपूर । महाईन्यूज ।



गेल्या स्पर्धेतील निराशाजनक कामगिरी मागे सारत भारताच्या पीव्ही सिंधूचा मंगळवारपासून सुरू होणाऱ्या मलेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ७५० दर्जा) दर्जेदार खेळाचा प्रयत्न असेल. या स्पर्धेत तिच्यासह एचएस प्रणॉयवर भारताची मदार आहे. सिंधूला दोन आठवड्यापूर्वी झालेल्या इंडोनेशिया स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत चीनच्या ही बिंग जियाओकडून पराभव पत्करावा लागला होता. आता कामगिरीत सुधारणेचा मानस असलेली सिंधू थायलंडच्या पोर्नवापी चोचुवांगविरुद्ध मलेशिया स्पर्धेतील मोहिमेला सुरुवात करेल. तसेच सायना नेहवाल पहिल्या फेरीत अमेरिकेच्या इरिस वांगशी सामना खेळेल. हा सामना जिंकल्यास तिची गाठ जपानच्या सहाव्या मानांकित नोझोमी ओकुहाराशी पडू शकते. पुरुषांमध्ये प्रणॉयची मलेशियाच्या डॅरेन लिवशी गाठ पडणार आहे. बी. साईप्रणीतचा इंडोनेशियाच्या अँथनी गिटिंगशी सामना होईल, तर समीर वर्माची लढत जॉनटन ख्रिस्टिशी होईल. पुरुष दुहेरीत सात्विकसाइराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीचा मलेशियाच्या मान वेइ चोंग आणि काइ वुन टी जोडीशी सामना होणार आहे. अश्विनी पोनप्पा आणि बी. सुमीत रेड्डी ही जोडी मिश्र दुहेरीत नेदरलँड्सच्या रॉबिन टॅबेलिंग आणि सेलेना पिकशी दोन हात करेल.

सिंधूला दोन आठवड्यापूर्वी झालेल्या इंडोनेशिया स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत चीनच्या ही बिंग जियाओकडून पराभव पत्करावा लागला होता. आता कामगिरीत सुधारणेचा मानस असलेली सिंधू थायलंडच्या पोर्नवापी चोचुवांगविरुद्ध मलेशिया स्पर्धेतील मोहिमेला सुरुवात करेल. तसेच सायना नेहवाल पहिल्या फेरीत अमेरिकेच्या इरिस वांगशी सामना खेळेल.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही